“मराठवाड्यातील शासकीय निवासी शाळेतील अनुसुचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणिक विकासाच्या भूमिकेचा एक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विश्वविद्यालय, नांदेड
विद्याशाखेतील शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी.
पदवीच्या नोंदणीसाठी सादर.

• संशोधक •
कुऱ्हे गोविंद टोपाजी
एम.ए. एम.एड. फील

• मार्गदर्शक •
प्रा. डॉ. कुलकर्णी एन.एच.
एम.एस्सी., एम.एड., एम.फील, पीएच.डी.
प्राचार्य, आर.बी.एम. शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
हट्टा ता. वसमत जि. हिंगोली

ऑगस्ट - 2016

अनुक्रमणिका

अ.क्र.	भाग	पृष्ठ क्र.
	मुखपृष्ठ	
	अनुक्रमणिका	I
१.	प्रस्तावना	१
२.	समस्या विधान	२
३.	कार्यात्मक व्याख्या	२
४.	संशोधनाची गरज	३
५.	संशोधनाचे महत्व	३
६.	संशोधनाची उद्दिष्टे	४
७.	संशोधनाची गृहीतके	४
८.	परिकल्पना	५
९.	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	५
१०.	जनसंख्या	५
११.	न्यादर्श	६
१२.	संख्याशास्त्रीय तंत्रे	६
१३.	संशोधन पध्दती	७
१४.	माहिती संकलनाची साधने	७
१५.	प्रबंध लेखन योजना	८
१६.	समारोप	
	संदर्भग्रंथ सूची	१०

प्रस्तावना :

१५ ऑगस्ट २०१६ रोजी आपन ७० वर्षे वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. या ७० वर्षांमध्ये आपन शिक्षणात वरील प्रगती केली.. आधुनिकीकरणाच्या, जागतिकरणाच्या स्पर्धेत देशपरत्वे, कालपरत्वे शिक्षणाची उद्दीष्ट्ये बदलत आहेत. विविध क्षेत्रातील बदलानुसार शिक्षण क्षेत्रातही नविन कल्पना पुढे येते आहेत.

शिक्षण म्हणजे उपदेशाने व्यक्तीत बदल घडवून आनने होय. म्हणजेच मानवाच्या शारिरीक, मानसिक व अर्ध्यात्मक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय.

शाळा ही सामाजिक संस्था आहे. शिक्षण संकल्पना व्यापक अर्थाने विचारात घेतली जाते. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान किंवा माहिती देणे असा मर्यादीत होत नाही. शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होय. शिक्षणातून बालकाच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास साधायचा असतो. संपुर्ण जीवनाची सुधारण शिक्षणातून करायची असते. शाळेतून विद्यार्थ्यांना ह्या सर्व प्रक्रिया मधून घडविले जाते. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात आज रोज नवे नवे शोध माहीती समोर येत आहे. या सर्व माहीतीला विद्यार्थ्याला समोर जाण्यासाठी विविध अंगाचा विकास व्हायला पाहीजे. हा सर्व विकास शाळेमधून होतो. शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडते आहे. विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तीमत्वाची जडण-घडण शिक्षणाचे मुख्य ध्येय-उद्दिष्टे आहे.

शिक्षण व्यक्तीला संस्कार मूल्य याचा अनुभव, ज्ञान, उपयोग जीवनात बदल करायला शिकतवते. शिक्षणातून विविध प्रवाह उदयास यआले आहेत. नवे तंत्र विकसित झाले आहे. शिक्षण प्रणाली विस्तारीत होवुन नव्या नव्या योजना आमलात आणून शिक्षणात बदल केले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ च्या नुसार व्यक्तीमत्वाचा व्यापक विकास व्हावा असा हेतू अवलंब केला. आजच्या शिक्षण क्षेत्रात आधुनिक युगात शिक्षणात बऱ्याचशा बाबी नवी माहितीची जाणीव होत आहे. आजच्या पालकाकडून, समाजाकडून शिक्षणाच्या मर्यादा ठरविण्यात आल्या आहेत. शिक्षण म्हणजे परीक्षा, अभ्यास चांगले गुण, व्यवसाय, या पलीकडे शिक्षण खुप काही आहे. शिक्षणाला बनवला जातो. परंतु शासणाने शिक्षणाची उद्दिष्टे आखली

आहेत. त्यामधून संपूर्ण मुल्यांचा विकास व्हावा म्हणून शालेय स्तरावर शिक्षण समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत जावे. नविन धोरणे, योजना, कार्यक्रम, उपक्रम राबविले जातात. याचाच अर्थ की, विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमा बरोबर भावनात्मक, क्रियात्मक, सामाजिक, नैतिक, कर्तव्य, समानता, एकात्मता, देशभक्ती, राष्ट्र भावना, ह्या मूल्यांची रुजवण आली पाहिजे.

आजचा विद्यार्थी उद्याचा सुजान नागरीक आहे.

२. समस्या विधान :

"मराठवाड्यातील शासकीय निवासी, शाळेतील अ.जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणीक विकासाच्या भूमिकेचा एक अभ्यास"

३. कार्यात्मक व्याख्या :

१. मराठवाडा : "महाराष्ट्र राज्यातील शासनाने नेमलेल्या च्यार प्रशासकीय विभागापैकी एक विभाग."

२. निवासी शाळा : " मुला-मुलींना निवास, भोजन व शिक्षण एकाच छताखाली राहून करता येते अशा शाळांना निवासी शाळा असे म्हणतात."

३. अनुसुचित जाती : "शासकीय मागासवर्गीय जाती परिच्छेदातील अ.क्र. ३७ म्हणजेच अनु. जाती."

४. नवबौध्द : "शासनाच्या सन २००० पासुनच्या नविन धोरणानुसार अनु. जातीतील बौध्द धर्मीयांना नवबौध्द म्हणतात. "

५. शैक्षणिक विकास : "विद्यार्थ्यांच्या भावनिक, बौध्दीक व शारीरीक विकास म्हणजेच शैक्षणिक विकास "

४. संशोधनाची गरज :

शिक्षणातुन विद्यार्थ्यांच्या विविध मूल्यांचा विकास साधायचा आसतो. शिक्षण ही बालकाची मूलभूत गरजा व हक्क बनली आहे. तेंव्हा त्याला शिक्षण मिळविण्यासाठी शासन सर्वोतोपरी कार्यरत आहे. ग्रामीण, दूर्मिळ भागांमध्ये अनुसुचित जाती व नवबौध्द, मुला-मुलींना शिक्षणासाठी दूरपर्यंत पायी जावे लागते किंवा शाळा उपलब्ध नसतात. गरिबीमुळे मुलांना आई-वडीलाबरोबर रोजगार शोधावा लागतो. जिथे खायला अन्नच मिळत नाही तिथे शिकणार काय म्हणून शासनाने निवासी शाळांची योजना आमलात आनली. या शाळांच्या माध्यमातुन मुला-मुलींना शिक्षण मिळत आहे. व या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आशा प्रकारच्या शाळा वेगवेगळे उपक्रम राहुन त्यांचा विकास साधायचा प्रयत्न करत आहेत. या सर्वांचा आढावा घेण्यासाठी म्हणून संशोधनाची गरज आहे.

५. संशोधनाचे महत्व :

एकेकाळी शिक्षण हे केवळ एका वर्गापूरतेच मर्यादित होतो. त्यावेळी शिक्षकी पेशा स्विकारणारे लोकही मर्यादितच होते परंतू आता शिक्षणाचा विकास फार झालेला आहे. वेगवेगळ्या योजना आमलांत येत आहेत. शासन एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत राहू नये म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. याचाच एक भाग म्हणजे ग्रामीण आणि दुर्मिळ तसेच शहरातील गरीब अ.जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावे या हेतूने शासकीय निवाशी शाळांची योजना आंमलात आणली शासकीय निवाशी शाळांमधुन अनुसुचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी वेगवेगळे अभ्यास पूरक व विकास पूरक कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जाते या उपक्रमांच्या परिणामांमुळे अनुसूचीत जाती व नवबौध्द मुले-मुलिंच्या विकास घेतो. या विकासात्मक भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाचे महत्व आहे.

६. संशोधनाची उद्दिष्टे :

१. मराठवाड्यातील शासकीय निवासी शाळेतील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुलांच्या उपस्थितीचा अभ्यास करणे.

२. मराठवाड्यातील शासकीय निवाशी शाळेतील अनु.जाती व नवबौध्द मुलींच्या उपस्थितीचा अभ्यास करणे.

३. मराठवाड्यातील शासकीय निवासी शाळांच्या अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणिक विकासाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

४. मराठवाड्यातील शासकीय निवासी शाळेतील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

५. मराठवाड्यातील शासकीय निवासी शाळेतील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

७. संशोधनाची गृहीतके :

१. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हयात एक शासकीय निवासी शाळा आहे.

२. मराठवाड्यातील शासकीय निवाशी शाळेतेल अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींची उपस्थिती भिन्न-भिन्न आसते.

३. मराठवाड्यातील शासकीय निवाशी शाळेतील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुलींच्या उपस्थितीत अडचणी आसतात.

४. मराठवाड्यातील शासकिय निवासी शाळेमध्ये अनुसूचीत जाति व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी उपक्रम राबविले जातात.

८. संशोधनाची परिकल्पना :

१. शासकीय निवाशी शाळांमधुन अनूसुचीत जाती व नवबौध्द मुलां-मुलींना शैक्षणिक संधी मिळते.

२. शासकीय निवासी शाळांमधुन अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींचा शैक्षणिक विकास होतो.

९. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

१. प्रस्तुत संशोधनात मराठवाड्यातील शासकीय निवाशी शाळांचा विचार करण्यास आला आहे.

२. प्रस्तुत संशोधनात निवाशी शाळेतील शिक्षकांचा विचार करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत संशोधनात शासकीय निवाशी शाळांमधील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींचा विचार करण्यात आला आहे.

संशोधनाची मर्यादा :

१. क्षेत्र मर्यादा : प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र हे मराठवाडा विभागापूरते मर्यादित आहे.

२. घटक मर्यादा : प्रस्तुत संशोधनात निवासी शाळेतील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींपुरतेच मर्यादित आहे.

३. आशय मर्यादा : प्रस्तुत संशोधन हे निवाशी शाळांच्या भूमिकी पूरतेच मर्यादीत आहे.

४. काल मर्यादा : प्रस्तुत संशोधन हे २०१६-१७ वर्षापूरतेच मर्यादित आहे.

१०. जनसंख्या :

शैक्षणिक संशोधनामध्ये समस्येचे उत्तर शोधून संशोधन प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी जी माहिती प्राप्त करावी लागते ती व्यक्ती व संस्थाकडून मिळवावी लागते, यांनाच प्रतिसादक असे

म्हणतात. प्रतिसादकामध्ये काही गुणधर्म समान असतात. एखाद्या विशिष्ट गटातील सर्व प्रतिसादकांना जनसंख्या हे नाव आहे. ही जनसंख्या निश्चित असू शकते. त्याचप्रमाणे अनिश्चित न मोजता येणारी, अनंतरही असू शकते.

प्रस्तुत संशोधनासाठी असणारी जनसंख्या ही मराठवाडयातील सर्व शासकिय निवासी शाळा व त्यामध्ये शिकणारे अनुसूचीत जाती व नवबौध्द मुल व मुली हे आहेत.

११. न्यादर्श :

कोणतेही संशोधन कार्य करीत असतांना संपूर्ण जनसंख्येचा विचार करुन निष्कर्ष मांडणे हे अत्यंत किचकट, वेळखाऊ व खर्चिक काम असते. त्यामुळेच जनसंख्येचा प्रातिनिधीक नमुना निवडणे आवश्यक असते.

"A sample as the name implies, is smaller representative of larger whole."

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सुगम यादृच्छिक पध्दतीने न्यादर्श निवडलेला आहे. यामध्ये 1. मराठवाड्यातील सर्व शासकिय निवासी शाळा, 2. अनुसूचीत जाती व नवबौध्द मुल-मुली.

१२. संख्याशास्त्रीय तंत्रे

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने शेकडेवारी ह्या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केलेला आहे.

१३. संशोधन पध्दती :

संशोधनाच्या विविध पध्दती आहेत, शैक्षणिक संशोधनात प्रामुख्याने तीन पध्दतींचा वापर केला जातो.

<u>शैक्षणिक संशोधन पध्दती</u>

ऐतिहासिक संशोधन पध्दती	**वर्णनात्मक संशोधन पध्दती**	**प्रायोगिक संशोधन पध्दती**
(Historical Research Method)	(Descriptive Research Method)	(Experimental Research Method)

संशोधनाच्या कार्यानुसार या पध्दतींचा वापर करुन घेतला जातो. सदरच्या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतींच्या प्रकारापैकी एक म्हणजेच सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

१४. माहिती संकलनाची साधने :

संशोधनात गुणात्मक व परिणात्मक आधार सामग्री आवश्यक असते. ही आधार सामग्री विश्वासाहार्य व वैध असावी लागते. कारण त्याद्वारे विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन संशोधनाचे निष्कर्ष मांडावे लागतात. त्यामुळे आधार सामुग्री मिळविण्यासाठी विविध प्रकारची तंत्रे व साधणे वापरली जातात ती पुढील प्रमाणे -



प्रस्तुत संशोधनात प्रामुख्याने प्रश्नावली (शिक्षक व विद्यार्थी) मुलाखत, निरिक्षण, पडताळासुची ह्या माहिती संकलनाच्या साधणाचा वापर केला आहे.

१५. प्रबंध लेखन योजना (प्रकरणीकरण) :

प्रस्तुत संशोधनाचे प्रबंध लेखन योजना पुढील प्रमाणे करण्यात येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना :

प्रकरण पहिल्यामध्ये मराठवाड्यातील शासकीय निवाशी शाळेतील अनुसूचीत जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शैक्षणिक विकासाची स्थिती स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्यानुसार समस्येची निवड करण्यात आलेली आहे व समस्येनुसार संशोधन समस्येची आवश्यकता, संशोधन समस्या, समस्येची स्पष्टीकरण, संशोधनाची उद्दिष्टे, पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या आणि संशोधनाची व्याप्ती व मर्यादा घेण्यात आली.

प्रकरण दुसरे : संबंधित संशोधन साहितयाचा आढावा :

प्रकरण दोन मध्ये संशोधनास दिशा मिळावी म्हणुन संबंधीत साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. यासाठी प्रामुख्याने पीएच.डी. व एम.फील., एम.एड्. स्तरावरील गत संशोधनांचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच संबंधीत संशोधनाला योग्य दिशा मिळावी यासाठी संदर्भीय नियतकालीकातून व इंटरनेटच्या सहाय्याने संबंधीत साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण तिसरे : संशोधन कार्य पध्दती

तिसऱ्या प्रकरणामध्ये संशोधन कार्यपध्दतीच्या तात्वीक भागाचे विवेचन केले आहे. प्रस्तुत संशोधनाची कार्यपध्दती व त्यांचे आशय विश्लेषण केलेले आहे. यामध्ये प्रस्तावना, संशोधन पध्दती म्हणजे काय ? संशेधनाची वैशिष्ट्ये, संशोधन पध्दतीचे प्रकार, निवडलेली संशोधन पध्दती - सर्वेक्षण पध्दतीचे महत्व, सर्वेक्षणाचे प्रकार, सर्वेक्षणाचे प्रकार व प्रस्तुत संशोधनाचा संबंध, संशोधनाची साधने, प्रश्नावली, माहिती संकलन, जनसंख्या, न्यादर्श,

माहिती संकलनाची साधने व सांख्यिकी विश्लेषणासाठी निवडलेले तंत्र या सर्व भागाचे तात्वीक विवेचन या प्रकरणामध्ये करण्यात आलेले आहे.

प्रकरण चौथे : माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण चौथ्यामध्ये प्रत्यक्ष कार्यवाही केल्यानंतर प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात माहिती संकलनाची पध्दती संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन तसचे पूर्व संशोधनाशी या संशोधनातील निष्कर्षाला संबंध त्याचप्रमाणे परिकल्पनाची यथार्थता मांडण्यात आली.

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण पाचवे मध्ये अध्यापक महाविद्यालयातील छात्राध्यापकांना शैक्षणिक साहित्य वापरतांना येणाऱ्या प्रमुख अडचणी कोणत्या यावर निष्कर्ष काढण्यात आला. त्यानुसार शिफारशी व पुढील संशोधनासाठी सूचना करण्यात आल्या.

: संदर्भग्रंथ सूची :

१. अहेर हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन, पुणे १९९५

२. देशपांडे प्रकाश व पाटोळे एन.के., संशोधन पध्दती, ग्रंथनिर्मिती केंद्र व च.म.मु.वि., नाशिक १९९४

३. कुंडले म.बा., शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, पुणे १९९६

४. मुळे रा.श. व उमाटे वि.तु., शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, विद्या बुक्स, औरंगाबाद, १९९८.

५. परचुरे सु.ना., परिसर अभ्यास व भूगोल विषयज्ञान व अध्यापन पध्दती, सुविचार प्रकाशन, पुणे १९९९.

६. भिंताडे वि.रा. (सप्टें. २००६) शिक्षणातील संशोधन, नूतन प्रकाशन पुणे.

७. पंडीत बं.बि. (१९९७), शिक्षणातील संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.

८. जगताप ह.ना., (१९९५), शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, नुतन प्रकाशन, पुणे

९. बापट भा.गो. (१९८८), शैक्षणिक संशोधन (तृतीयावृत्ती), नुतन प्रकाशन, पुणे

१०. नागतोडे किरण, (१४ नोव्हेंबर १९९७), शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना, आधुनिक विचारप्रवाह, प्रकाशन, नागपूर.

११. कुंडले म.बा., १९९६, शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, विद्याप्रकाशन पुणे.